**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2019 = 6.38, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFERRED JOURNAL, NOV-DEC, 2019, VOL- 7/55*

# ठाणे जिल्ह्यातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळांचा तौलनिक अभ्यास

**विजय कोवे[1] & विनोद रायपुरे[2], Ph. D.**

*[1]संशोधक विद्यार्थी, कवियत्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव*

*[2]मार्गदर्शक*

**Abstract**

*आदिवासी समजल विकासाच्या प्रवाहात सामाऊन घेण्याच्या दृष्टीने आदिवासी समाजात शिक्षणाचा प्रसार होणे जरुरीचे आहे हे लक्षात घेऊन देशात आश्रमशाळांची योजना इ. स. १९७२ पासून अंमलात आली. काही आश्रमशाळा शासनामार्फत व काही आश्रमशाळा खाजगी अनुदानित संस्थांमार्फत चालवल्या जात आहेत. प्रस्तुत अभ्यासाद्वारे ठाणे जिल्ह्यातील या दोन्ही प्रकारच्या आश्रमशाळांमधील विध्यार्थ्यांना पुरवण्यात आलेल्या सोयी-सुविधांचा, शैक्षणिक दर्जाचा तौलनिक आढावा घेण्यात आला असून आश्रमशाळांतील शिक्षकांना जाणवणाऱ्या समस्यांवरही भाष्य केलेले आहे.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## १) प्रस्तावना –

आश्रमशाळेची योजना इ.स. १९७२ पासून सुरु करण्यात आली, ही योजना एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत सुरु करण्यात आली. महाराष्ट्रातील ठाणे, नागपूर, अमरावती व नाशिक या चार अतिरिक्त आदिवासी आयुक्त कार्यालयाच्या प्रकल्पांतर्गत एकूण २९ आदिवासी विकास प्रकल्पांच्या माध्यमातून या आश्रमशाळा सुरु आहेत.शासकीय व अनुदानित अशा दोन्ही प्रकारच्या आश्रमशाळांमधून अनेक आदिवासी मुळे-मुली शिक्षण घेत आहेत. शासकीय आश्रमशाळांचे सर्व व्यवस्थापन व कार्यवाही शासनामार्फत चालते तर अनुदानित आश्रमशाळा खाजगी संस्थांच्या मार्फत चालते तर अनुदानित आश्रमशाळा खाजगी संस्थांमार्फत चालवल्या जातात. आदिवासींच्या शैक्षणिक विकासाबाबत बाबत बऱ्याच अभ्यासकांनी अध्ययनाद्वारे आपली निरीक्षणे व मते मांडली आहेत. काही अभ्यासकांच्या मते शासकीय व अनुदानित आश्रमशाळांच्या संदर्भात कीध्यार्थ्यांची शैक्षणिक

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**प्रगती, शाळेतील सोयी सिविधा, शिक्षकांचे अध्ययन त्यांना जाणवणाऱ्या समस्या आणि आदिवासी मुलांच्या शैक्षणिक विकास संबंधी असणाऱ्या अनेक बाबीच्या दर्जात तफावत दिसते. वास्तवात अशी तफावत खरोखरच आहे का नाही याची पडताळणी करण्याचे प्रमुख उद्दिष्ट प्रस्तुत अभ्यासाचे आहे.**

**२) संदर्भ साहित्याचा आढावा –**

**क) पी. ए. तिकोणे, (२०१७), यांनी महाराष्ट्राच्या नाशिक जिल्ह्यातील आश्रमशाळांचे सर्व्हेक्षण केले लेखकाच्या मते, प्रचंड खर्च करून सुद्धा या भागात आदिवासींच्या शैक्षणिक विकास म्हणावा तसा झाला नाही. या अभ्यासाद्वारे लेखकाने आदिवासींच्या शैक्षणिक विकास संबंधी गेल्या दोन दशकातील सांख्यिकीय आकडेवारी देखील दिली आहे. लेखकाच्या मते, स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासींच्या शैक्षणिक गुणात्मक वाढीकडे फारसे लक्ष दिले गेले नाही. त्यामुळे नाशिक भागातील आदिवासी समाज शैक्षणिकदृष्ट्या आजही मागासलेला आहे.**

**ख) राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग, (२००९), यांच्या वारीने महाराष्ट्रातील काही आश्रमशाळेतील आदिवासींच्या शिक्षणाची व्यवस्था कशी आहे. या बाबत सर्व्हेक्षण अभ्यास केला होता. या अभ्यासाद्वारे आश्रमशाळेतील शिक्षणाचा दर्जा, उपलब्ध शैक्षणिक सोयी-सुविधा, शैक्षणिक साहित्य या बाबत परीक्षण केले. या सर्व्हेक्षणाद्वारे असे लक्षात आले कि, बहुतांशी आश्रमशाळांच्या इमारतीचे बांधकाम दर्जेदार नाही तसेच इतर सोयी-सुविधांचा सुद्धा अभाव जाणवला. तेथील शैक्षणिक दर्जा देखील फारसा समाधानकारक नसल्याचे निदर्शनास आले.**

**ग) एल. जी. कडगाळे, (२००८), यांनी शासकीय आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना जाणवणाऱ्या समस्या व अडचणींवर प्रकाश टाकला आहे. आदिवासी विद्यार्थ्यांचे नापासाचे प्रमाण, गळतीचे प्रमाण, पालकांची उदासीनता आणि त्यांचा शिक्षणाप्रती असलेला नकारात्मक दृष्टीकोन आणि आश्रमशाळेतील सोयी-सुविधा या बाबत टीकात्मक चर्चा केली आहे.**

**घ) उ. प्र. थोरात, (१९९३), यांनी नाशिक जिल्ह्याच्या दिंडोरी तालुक्यातील निगडोळ या आदिवासी भागातील शासकीय आश्रमशाळेचे परीक्षण केले. लेखिकेच्या मते, या शाळेत सर्व सुविधा पुरेश्या**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

प्रमाणात पुरवल्या जात आहेत. या शाळेतील बहुतांशी विद्यार्थी कला, क्रीडा, शिक्षण इत्यादी क्षेत्रात निपुण असलेली आढळून आली. या शाळेत आदिवासी मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व शिक्षक विषेश कष्ट घेत असल्याचे लेखिकेला दिसून आले.

ङ) इंदरशहा मडावी, (२००२), यांनी आश्रमशाळा योजने विषयी माहिती दिली आहे. लेखकाने असे नमूद केले आहे कि, आश्राक्षाला योजनेमुळे आदिवासी भागातील मुलांच्या शैक्षणिक विकासाला गती मिळाली आहे. लेखकाच्या मते, आदिवासींच्या शैक्षणिक विकासाच्या कार्यक्रमामध्ये लोकांचा सक्रीय सहभाग हवा आणि असे झाले तरच आदिवासींच्या शैक्षणिक विकास कार्यक्रम यशस्वी होऊ शकेल.

३) अभ्यासाचे महत्व –

शासकीय आश्रमशाळांची योजना सुरु झाल्या पासून शासकीय व अनुइदनित आश्रमशाळांमार्फत आदिवासी मुलांच्या शैक्षणिक विकासाचे कार्य अखंडपणे सुरु आहे. काही अभ्यासकांच्या मते शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमध्ये विविध पातळ्यांवर राफावती आहेत. ज्या बाबीसंबंधी फरक जाणवत आहे त्या बाबी म्हणजे विध्यार्थ्यांना पुरवण्यात येणाऱ्या निवास सुविधा, भोजन, आरोग्य विषयक सुविधा इत्यादी. शासकीय व अनुदानित आश्रमशाळांबाबत अधूनमधून प्रसार माध्यमांद्वारे टीकेची ह्जोड उठवताना दिसते. आश्रमशाळांमधील समस्या, मग त्या विध्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती संबंधातील असो अथवा विध्यार्थ्यांना पुरवल्या जाणार्या इतर भौतिक सोयी सुविधां संबंधी असो या बद्दल वारंवार चर्चा होताना दिसते. या बाबत खरे वास्तव काय आहे हे हाणून घेण्याच्या दृष्टीने प्रस्तुत अभ्यास महत्वाचा आहे.

४) अभ्यासाची उद्दिष्ट्ये –

अ) शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील निवास, भोजन इत्यादी सुविधा पुरेश्या प्रमाणात उपलब्ध आहेत का नाही या बाबत विद्यार्थ्यांची मते जाणून घेणे.

आ) शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षकांच्या शिकवण्याच्या पद्धतीबाबत विद्यार्थ्यांची मते जाणून घेणे.

इ) शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील विध्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा तौलनिक आढावा घेणे.

ई) शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षकांना आदिवासी मुलांना शिकताना कोणत्या समस्या जाणवतात याची माहिती घेणे.

उ) शासकीय व अनुदानित असश आदिवासी मुलांच्या शैक्षणिक विकासासाठी कोणत्या बाबींवर विशेषत्वाने भर दिला जातो हे जाणून घेणे.

**५) संशोधन पध्दती –**

प्रस्तुत अभ्यासाचे स्वरूप हे वर्णनात्मक व निदनात्मक असे असून प्रामुख्याने सर्व्हेक्षण पद्धतीवर आधारलेले आहे. मुलाखत अनुसुचीच्या माध्यमातून उद्दिष्टांना अनुसरून प्राथमिक माहितीचे संकलन ठाणे जिल्ह्यातील निवडण्यात आलेल्या २६ शासकीय व अनुदानित आश्रम शाळांमधील ३३९ विध्यार्थी व २६ शिक्षकांनकडून करण्यास आले. संकलित केलेल्या प्राथमिक माहितीचे विश्लेषण करण्यासाठी शेकडेवारी पद्धतीचा अवलंब करण्यात आल आहे. यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा अवलंब करून नमुना निवड केली आहे. (१८५ शासकीय अनुदानित विद्यार्थी व अनुदानित आश्रम शाळेतील विद्यार्थी ) १४ शिक्षक शासकीय आश्रमशाळेतून निवडण्यात आले तर १२ शिक्षक अनुदानित आश्रमशाळेतून निवडले.

**६) प्राथमिक माहितीचे विश्लेषण-**

निवडण्यात आलेल्या आश्रमशाळांमध्ये भोजन, निवास आणि इतर शैक्षणिक सुविधा पुरेशा प्रमाणात आहेत का नाही या बाबत विद्यार्थ्यांची मते काय आहेत याची माहिती पुढील तक्त्यात दर्शवली आहे.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**तक्ता क्र. १ आश्रमशाळेत पुरवण्यात येणाऱ्या भोजन, निवास आनिएत्र शैक्षणिक सुविधांची उपलब्धता.**

| वद्यार्थ्यांचे मत | शासकीय आश्रमशाळा | | अनुदानित आश्रमशाळा | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | वारंवारिता | शे. प्रमाण | वारंवारिता | शे. प्रमाण | वारंवारिता | शे. प्रमाण |
| पुरेश्या प्रमाणात उपलब्ध आहेत | १८५ | १००% | १५१ | ९८.१% | ३३६ | ९९.१% |
| पुरेश्या प्रमाणात उपलब्ध नाहीत | - | - | ०३ | १.९% | ०३ | ०.९% |
| एकूण | १८५ | १००% | १५४ | १००% | ३३९ | १००% |

**शासकीय आश्रमशाळेतील १००% विद्यार्थ्यांच्या मते, आश्रमशाळेमार्फत ज्या सोयी-सुविधा (भोजन, निवास, शैक्षणिक सुविधा) पुरवल्या जातात त्या पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत तर अनुदानित आश्रमशाळेतील ९८.१% विद्यार्थ्यांना या सोयीसोयी-सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध असल्याचे नमूद केले आहे. एकुणात अशा विद्यार्थ्यांचे प्रमाण ९८.१% इतके आहे. याचाच अर्थ असा की, आदिवासी मुलांच्या शैक्षणिक विकासासाठी ज्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत त्या सुविधा दोन्ही प्रकारच्या आश्रमशाळांमध्ये पुरेश्या प्रमाणात उपलब्ध आहेत. सोयी सुविधांच्या उपलब्धतेबाबत दोन्ही प्रकारच्या शाळांमध्ये फारशी तफावत दिसून येत नाही; जी तफावत आहे टी नगण्य स्वरुपाची आहे.**

**आदिवासी विद्यार्थ्यांना विश्वासात घेऊन त्यांच्या कलाने त्यांना शिकवणे ही एक कौशल्याची बाब आहे. आदिवासी विद्यार्थ्यांची सांस्कृतिक, सामाजिक, आणि कौटुंबिक पार्श्वभूमी इतर विद्यार्थ्यांपेक्षा भिन्न असते. अशा परिस्थितीत आश्रमशाळेतील शिक्षक कसे शिकवतात या बाबत विद्यार्थ्यांची मते काय आहेत या बाबतचा तपशील पुढील तक्त्यात नमूद केला आहे.**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**तक्ता क्र. २ आश्रमशाळेतील शिक्षकांच्या शिकवण्याच्या पध्दती बाबत मते.**

| वद्यार्थ्यांचे मत | शासकीय आश्रमशाळा | | अनुदानित आश्रमशाळा | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | वारंवारिता | शे. प्रमाण | वारंवारिता | शे. प्रमाण | वारंवारिता | शे. प्रमाण |
| खूपच चांगले शकवतात | १८५ | १००% | १५२ | ९८.७% | ३३७ | ९९.४% |
| शकवलेले फारसे समजत नाही | - | - | ०२ | १.३% | ०२ | ०.६% |
| चांगले शकवत नाही | - | - | - | - | - | - |
| एकूण | १८५ | १००% | १५४ | १००% | ३३९ | १००% |

**शासकीय आश्रमशाळेच्या १००% विद्यार्थ्यांनी आणि अनुदानित आश्रमशाळेतील ९७.७% विद्यार्थ्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांच्या शाळेतील शिक्षक खूपच चांगल्या पद्धतीने शिकवतात, अनुदानित आश्रमशाळेतील १.३% विद्यार्थ्यांनी असे नमूद केले आहे की, शिक्षकांनी शिकवलेले फारसे समजत नाही किंवा शिक्षकांची शिकवण्याची पद्धत जरा अवघड आहे, परंतु एकुणात अशा विद्यार्थ्यांचे प्रमाण नगण्य आहे** (०.६%).

**शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती जाणून घेण्याच्या दृष्टीने त्यांच्या वार्षिक गुणांच्या टक्केवारीचे अवलोकन केले असता, जी माहिती मिळाली त्याचा तपशील पुढील तक्त्यात नमूद केला आहे.**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**तक्ता क्र.३ विद्यार्थ्यांच्या वार्षिक गुणांची टक्केवारी**

| वा षक गुणांचे प्रमाण | शासकीय आश्रमशाळा | | अनुदानित आश्रमशाळा | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | वारंवारिता | शे. प्रमाण | वारंवारिता | शे. प्रमाण | वारंवारिता | शे. प्रमाण |
| ३०% ते ४०% | ०९ | ४.८% | ०३ | १.९% | १२ | ३.५% |
| ४१% ते ५०% | ९७ | २०% | ६१ | ३९.६% | ९८ | २८.९% |
| ५१% ते ६०% | १३९ | ७५% | ५८ | ३७.६% | १९७ | ५८.१% |
| ६१% ते ७०% | - | | ३२ | २०.७% | ३२ | ९.४% |
| एकूण | १८५ | १००% | १५४ | १००% | ३३९ | १००% |

**शासकीय आश्रमशाळेतील दरवर्षी ५१% ते ६०% गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ७५% असून अनुदानित अशा विद्यार्थ्यांचे प्रमाण ३७.६% इतके आहे; तर एकुणात हे प्रमाण ५८% इतके आहे. ३०% ते ४०% गुण मिळवणाऱ्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे प्रमाण अनुक्रमे ४.८% आणि १.९% इतके आहे. तसेच शे. ४१% ते ५०% गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण शासकीय आश्रमशाळेत २०% आहे तर अनुदानित आश्रमशाळेत ३९.९% इतके असलेले निदर्शनास आले. दरवर्षी ६१% ते ७०% गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचे अनुदानित आश्रमशाळेतील प्रमाण २०.७% इतके आढळले. ७०% पेक्षा अधिक गुण मिळणारे विद्यार्थी दोन्ही प्रकारच्या आश्रमशाळेत आढळून आले नाहीत. अनुदानित आश्रमशाळेत दरवर्षी ६१% ते ७०% पर्यंत गुण मिळणारे विद्यार्थी आहेत, मात्र शासकीय आश्रमशाळांमध्येइतके गुण मिळवणारे विद्यार्थी आढळून आले नाहीत.**

**आश्रमशाळेतील बहुतांशी विद्यार्थी हे आदिवासी समाजातील आहेत. त्यांची भाषा, राहणीमान, संस्कृती, दैनंदिन गरजा या विगर आदिवासी समाजापेक्षा किती तरी वेगळ्या आहेत, आणि लौकिक अर्थाने हे लोक आजही सर्वच बाबतीत मागासलेले असल्याचे दिसून येते. आश्रमशाळांच्या माध्यमातून आदिवासी मुलांवर चांगले संस्कार करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य तेथील**

**शिक्षक करीत असतात. परंतु या कार्यात शिक्षकांना अनेक समस्या व अडचणींना सामोरे जावे लागते. या समस्या नेमक्या कोणत्या आहेत या बाबतची माहिती पुढील तक्त्यात नमूद केली आहे.**

**तक्ता क्र. ४ आदिवासी मुलांना शिकवताना शिक्षकांना जाणवणाऱ्या प्रमुख अडचणी/समस्या**

| तपशील | शासकीय आश्रमशाळा | | अनुदानित आश्रमशाळा | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | वारंवारिता | शे. प्रमाण | वारंवारिता | शे. प्रमाण | वारंवारिता | शे. प्रमाण |
| भाषेची अडचण | ०८ | ५७.१% | ०५ | ४१.६% | १३ | ५०% |
| शैक्ष णक साधनांचा अभाव | ०२ | १४.२% | ०४ | ३३.३% | ०६ | २३% |
| अपुरी जागा | - | - | - | - | - | |
| कोणतीही अडचण/समस्या नाही | ०४ | २८.५% | ०३ | २५% | ०७ | २६.९% |
| एकूण | १४ | १००% | १२ | १००% | २६ | १००% |

**शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील अनुक्रमे ५७.१% व ४१.६% शिक्षकांनी असे नमूद केले आहे की, आदिवासी मुलांना शिकताना भाषेची समस्या निर्माण होते. सर्व विषय हे प्रमाणभूत मराठीत असल्यामुळे आणि आदिवासी मुलांची मातृभासा ही त्यांची आदिवासी बोलो भाषा असल्यामुळे बऱ्याच वेळा त्यांना काही गोष्टी समजून सांगणे कठीण होते. शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील अनुक्रमे १४.२% व ३३.३% शिक्षकांच्या मते शैक्षणिक सुविधांचा अभाव ही एक मोठी समस्या आहे. बहुतांशी वेळा शैक्षणिक साधनांचा वापर करून आदिवासी मुलांना गणित, शास्त्र या सारखे विषय समजून सांगणे सोपे ठरते. शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील अनुक्रमे २८.५% व २५% शिक्षकांनी कोणत्याही प्रकारच्या अडचणी जाणवत नाहीत. तौलनिक दृष्ट्या पाहिजे असता भाषेची अडचण थोड्याफार प्रमाणात दोन्ही प्रकारच्या आश्रमशाळेतील शिक्षकांना जाणवतात असे निदर्शनास**

**आले.एकुणात अशा शिक्षकांचे प्रमाण ५०% इतके आहे. शैक्षणिक साधनांचा अभाव ही समस्या शासकीय आश्रमशाळेपेक्षा अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षकांना अधिक जाणवत असल्याचे निदर्शनास आले. आदिवासी मुलांना शिकवताना कोणतीही अडचण अथवा समस्या जाणवत नसणाऱ्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षकांच्या प्रमाणात फारशी तफावत नसल्याचे दिसून आले.**

**आदिवासी मुलांच्या शिक्षणिक विकासासाठी शाळांकडून प्रामुख्याने कोणत्या बाबींवर विषेश भर दिला जातो; या बाबत जाणून घेणे हे प्रस्तुत अभ्यासाच्या दृष्टीने खूप महत्वाचे ठरते. म्हणून या बाबत शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षकांकडून जी माहिती संकलित केली टी पुएहील तक्त्यात नमूद केली आहे.**

**तक्ता क्र. ५ आदिवासी मुलांच्या शैक्षणिक विकास प्रकीयेतील भर दिलेल्या प्रमुख बाबी (बहुपर्यायी उत्तरे)**

| तपशील | शासकीय आश्रमशाळा | | अनुदानित आश्रमशाळा | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | वारंवारिता | शे. प्रमाण | वारंवारिता | शे. प्रमाण | वारंवारिता | शे. प्रमाण |
| शक्षणाचा दर्जा | ०५ | ३५.७% | ०३ | २५% | ०८ | ३०.८% |
| वद्यार्थी- शक्षक प्रमाण | ०२ | १४.३% | ०७ | ८.३% | ०३ | ११.५% |
| शैक्ष णक प्रकीयेअस अनुकूल वातावरणण | ०३ | २१.४% | ०४ | ३३.३% | ०७ | २६.९% |
| व्यवस्थापन व चांगल्या सोयी-सु वधा | ०३ | २१.४% | ०४ | ३३.३% | ०७ | २६.९% |
| शक्षकांची गुणवत्ता | ०६ | ४२.९% | ०३ | २५% | ०९ | ३४.६% |
| वरील सर्व बाबी | ०२ | १.१% | - | - | ०२ | ०.६% |

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

आदिवासी मुलांच्या शैक्षणिक विकासाचे उद्दिष्ट साध्या करण्यासाठी शिक्षणाच्या दर्जावर प्रामुख्याने भर देण्यात येतो, असे शासकीय आश्रमशाळा व अनुदानित आश्रमशाळेतील अनुक्रमे ३५.७% व २५% शिक्षकांनी नमूद केले आहे. एकुणात असे नमूद करणार्यांचे प्रमाण ३०.८% इतके आहे. शिक्षणाचा दर्जा राखण्याच्या दृष्टीने विद्यार्थी-शिक्षक यांचे प्रमाण योग्य असणे गरजेचे आहे. म्हणून विद्यार्थी-शिक्षक यांचे प्रमाण शाळेमध्ये योग्य कसे राहील यावर विशेष भर देण्यात येतो, असे शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील अनुक्रमे १४.३% व ८.३% शिक्षकांनी नमूद केले आहे. शाळेत, शैक्षणिक प्रक्रियेस अनुकूल वातावरण निर्माण करण्यावर अधिक भर देण्यात येतो असे,शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील अनुक्रमे २१.४% व ३३.३% शिक्षकांनी नमूद केले आहे. व्यवस्थापन व चांगल्या दर्जाच्या सोयी-सुविधा पुरवण्यावरही भर दिला जात असल्याचे ४२.९% शासकीय आश्रमशाळेतील शिक्षकांनी आणि २५% अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षकांनी नमूद केले आहे. तौलनिकदृष्ट्या पाहता शासकीय आश्रम शाळेतील मुलांच्या शैक्षणिक विकासासाठी प्रामुख्याने शिक्षणाचा दर्जा व शिक्षणाची गुणवत्ता या बाबींवर अधिक भर देण्यात येतो तर अनुदानित आश्रमशाळांमध्ये शिक्षणाचा दर्जा राखण्या बरोबरच शैक्षणिक प्रक्रियेस अनुकूल वातावरणाची निर्मिती करणे, चांगले व्यवस्थापन आणि शिक्षकांची गुणवत्ता वाढवणे या बाबींवर विशेषत्वाने भर देण्यात येत असल्याचे दिसून आले. थोडक्यात असे म्हणता येईल कि दोन्ही प्रकारच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने सर्वच बाबींवर भर देण्यात येत आहे. फरक एवढाच आहे कि, काही बाबींवर शासकीय आश्रमशाळेतील अधिक भर दिला जातो तर काही बाबींवर अनुदानित आश्रमशाळांमध्ये अधिक भर दिला जातो.

**७) महत्वाचे निष्कर्ष**

अ) विद्यार्थ्यांकडून संकलित केलेल्या प्राथमिक माहितीवरून असा निष्कर्ष काढता येतो कि आदिवासी मुलांच्या शैक्षणिक विकासासाठी शासनाने ज्या सोयी-सुविधा मोफत उपलब्ध करून दिल्या आहेत, त्या अभ्यासासाठी निवडण्यात आलेल्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमध्ये पर्याप्त प्रमाणात

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

उपलब्ध आहेत. सोयी सुविधांच्या उपलब्धतते बाबत तौलनिक दृष्ट्या दोन्ही प्रकारच्या शाळांमध्ये फारशी तफावत दिसून आली नाही..

आ) आदिवासी विद्यार्थ्यांकडून संकलित केलेल्या माहितीवरून असे निदर्शनास आले कि, निवडण्यात आलेल्या जवळपास सर्वच शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमधील शिक्षक अध्यापनाचे कार्य उत्तमपणे पार पडत आहेत. त्यांनी शिकवलेले विद्यार्थ्यांना समजते. तौलनिकदृष्ट्या या बाबत दोन्ही प्रकारच्या आश्रमशाळांमध्ये फारशी तफावत आढळून आली नाही.

इ) आदिवासी विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती जाणून घेण्याच्या दृष्टीने त्यांना मिळणाऱ्या वार्षिक गुणांच्या टक्केवारीचे अवलोकन केले असता असे निदर्शनास आले की, दोन्ही प्रकारच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना दरवर्षी सर्व साधारणपणे ४१% ते ५०% आणि ५१% ते ६०% दरम्यान गुण मिळतात. ६०% वर गुण मिळवणारे विद्यार्थी केवळ अनुदानित आश्रमशाळेतच आढळून आले.

ई) शिक्षकांकडून संकलित केलेल्या माहित वरून असे निदर्शनास आले की, आदिवासी विद्यार्थ्यांना शिकवताना भाषेची अडचण प्रामुख्याने जाणवते. त्याच बरोबर शैक्षणिक साधनांचा अभाव ही समस्या देखील शिक्षकांना शिकवताना जाणवतात. शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील खूपच कमी शिक्षकांना या अडचणी/समस्या जाणवत नसल्याचे निदर्शनास आले,

उ) आदिवासी मुलांच्या शैक्षणिक विकासासाठी प्रामुख्याने कोणत्या बाबींवर विशेष भर दिला जातो या संदर्भात जी माहिती मिळणी त्या वरून असे निदर्शनास आले की, तौलनिकदृष्ट्या शासकीय आश्रमशाळेतील मुलांच्या शैक्षणिक विकासासाठी प्रामुख्याने शिक्षणाचा दर्जा, शिक्षकांचे अध्यापन कौशल्य व गुणवत्ता या बाबींवर आधीक भर दिला जातो. दोन्ही प्रकारच्या आश्रमशाळांमध्ये थोड्याफार शैक्षणिक प्रक्रियेस अनुकूल वातावरणाची निर्मिती करणे, चांगले व्यवस्थापन व विद्यार्थ्यांना चांगल्या सोयी सुविधा पुरवणे आणि शिक्षकांच्या गुणवत्ता वाढीवरही भर देण्यात येतो असे निदर्शनास आले. या वरून असे म्हणता येईल की, आदिवासी मुलांच्या शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने सर्व प्रकारचे प्रयत्न करण्यात येत आहेत. ८) सूचना –

क) आदिवासी मुलांच्या शैक्षणिक विकासात जे अडथळे आहेत, ज्या समस्या आहेत त्यांचे निराकरण करण्यासाठी शासकीय स्तरावर एक कायमस्वरूपी सामिठी प्रत्येक जिल्हा स्तरांवर नेमावी. या समितीने आश्रमशाळांना वारंवार भेटी देऊन तेथील समस्यांचा व अडचणींचा सातत्याने आढावा घ्यावा आणि त्यावर योग्य त्या उपाययोजना कराव्यात.

ख) शासन पातळीवर, आदिवासींच्या शैक्षणिक विकासासाठी स्वातंत्र्य शिक्षण विभाग स्थापन करून या विभागाला स्वायत्तता देण्यात यावी जेणे करून विकासात्मक कार्यक्रमांची अंमलबजावणी विनाविलंब करता येऊ शकेल.

ग) काही आदिवासी समुदायाचा शिक्षणाप्रती असलेला नकारात्मक दृष्टीकोन दूर करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या शाळा गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी शासकीय धोरणांमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल करणे गरजेचे आहे.

घ) कोणत्याही प्रकारची आश्रमशाळा चालवताना तेथील विद्यार्थ्यांच्या शैक्षणीक व भौतिक गरजांचा सर्वप्रथम विचार व्हायला हवा. त्यासाठी शासनाकडून पुरेशी व पर्याप्त प्रमाणात निधीची तरतूद केली पाहिजे.

च) शिक्षणाप्रती असलेला आदिवासी पालकांचा नकारात्मक दृष्टीकोन दूर करण्यासाठी, त्यांचे प्रबोधन होणे गरजेचे आहे. यासाठी प्रशिक्षित समाजकार्यकर्त्यांची मदत घेता येऊ शकेल हे काम आश्रमशाळांच्या माध्यमातून करता येऊ शकेल.

९) सारांश –

स्वतंत्र भारताच्या घटनात्मक अधिकारानुसार आदिवासी समाजाला सर्व प्रकारच्या मिळून त्यांचा विकास झाला पाहिजे. शिक्षण हे एक असे मध्यम आहे कि, ज्याद्वारे हे शक्य आहे. म्हणून शासनाने आश्रमशाळा योजने अंतर्गत ग्रामीण आणि विशेषतः आदिवासी मुलांना शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली. महाराष्ट्रात ठाणे, नागपूर, अमरावती व नाशिकया चार जिल्ह्यात आश्रमशाळा योजना कार्यान्वित आहे. या चार जिल्ह्यांपैकी केवळ ठाणे जिल्ह्यात कार्यरत असणार्या शासकीय व

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**अनुदानित आश्रमशाळांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना पुरवण्यात येणाऱ्या विविध सोयी-सुविधांच्या बाबत शासकीय व अनुदानित शाळांमध्ये बरीच तफावत आढळते, याला स्थलपरत्वे अनेक करणे असू शकतात. परंतु, ठाणे जिल्ह्यातील निवडण्यात आलेल्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळांच्या बाबत पुरवण्यात येणाऱ्या सर्व सोयी सुविधांच्या संबंधी फारश्या तफावती आढळून आल्या नाहीत.**

**संदर्भ**

*आगलावे प्रदीप, (२००४), 'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र,' श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.*

*गोरे गोविंद, (१९९७), 'आदिवासींचे शिक्षण, साकेत प्रकाशन,' औरंगाबाद.*

*गोरे गोविंद, (१९९८), 'आदिवासी विकास योजना,' पुणे आदिवासी विकास प्रतिष्ठान.*

*महाराष्ट्र शासन, 'आश्रमशाळा संहिता,' आदिवासी विभाग.*

*पानसे रमेश, (२००८), 'स्वयंसेवी संस्था आणि आदिवासी विकास,' अर्थसंवाद, खंड ५, अंक ४.*

*कुलकर्णी रेणुका, (२००७), 'आदिवासी आश्रमशाळेसंबंधी शासकीय धोरणे: एक चिकित्सक अभ्यास, शिक्षण आणि समाज,' अंक ३३, भारतीय शिक्षण संस्था, पुणे.*

*तिकोने, पी. आर, (२००५), 'महाराष्ट्र राज्यातील आणि जमातीची शैक्षणिक सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीची पाहणी', आदिवासी संशोधन पत्रिका आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.*

*पानसे, व्ही. जी., (२००१), 'आदिवासी विकासात आश्रमशाळांचे योगदान: चीकिस्तक अभ्यास', आदिवासी संशोधन पत्रिका, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.*

*व्ही. बी. सत्यसावित्री आणि होकारेरी, पी. एम., (२०१८), 'आश्रमशाळा समस्या आणि आव्हानांचा प्रभाव'*

*Bhagwat M. K., (2010), 'Ashram Schools run by NGO's,' Economic and Political Weekly.*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*